# हायपरथायरॉडीझम

**थायरॉइड ग्रंथींची अवास्तव काम करण्याची स्थिती म्हणजे काय?**

जेंव्हा थायरॉईड संप्रेरकाची निर्मीती उच्च पातळीत होते तेंव्हा थायरॉईड ग्रंथींची अवास्तव काम करण्याची स्थिती निर्माण होते. थायरॉईड संप्रेरक शरीराचे तापमान हृदयाची स्पंदने, वाढ आणि वजन नियंत्रित करतात.

**धोक्याची कारणे-**




- शरीर स्वतःच्याच पेशीजालांना प्रतिद्रव्ये निर्माण करते असे रोग उदा. थायरॉईड ग्रंथी मोठी होणे - गॉयटर किंवा ग्रेव्ह डिसीज
- काही विशिष्ठ औषधे उदा. लिथियम अमिओडेरॉन किंवा ॲस्परिन
- विषाणू संसर्ग
- थायरॉईड ग्रंथींचा दाह किंवा कर्करोग
- आयोडिनचे प्रमाण अधिक असणे

**चिन्हे आणि लक्षणे-**

- वजन कमी होणे,अतिशय भूक लागणे, किंवा अतिसार किंवा बध्दकोष्ठता
- घाम जास्त येणे आणि उष्णता सहन न होणे
- अस्वस्थता, आराम न वाटणे
- थरथर वाढणे आणि शांत झोप न लागणे
- विश्रांती घेत असतांनाही हृदयाच्या स्पंदनाचा वेग वाढणे आणि वेगाने श्वास घेणे
- मानेत वेदनादायी गाठ येणे किंवा डोळयांचे बुब्बुळ पुढे येणे
- थकवा आणि स्नायूत अस्वस्थपणा जाणवणे
- कमी किंवा मासिक पाळी न येणे

**निदान-**

- TSH - थायरॉईड स्टिम्युलेटिंग हार्मोन टेस्ट थायरॉईड ग्रंथीतून स्त्रवणा-या संप्रेरकाच्या स्त्रवण्याच्या नियंत्रण दाखविणारी चाचणी
- (T3, T4) थायरॉईड हार्मोन्स संख्या वाढलेले आढळतात.
- आयोडिन थायरॉईड स्कॅन

**उपचार-**

- ॲन्टी थायरॉईड औषधे थायरॉईड संप्रेरक कमी पातळीत आणतात आणि लक्षणे कमी करतात.
- किरणोत्सारी, आयोडिन देऊन थायरॉईड ग्रंथीतील काही पेशी मारल्या जातात , त्यामुळे थायरॉईड संप्रेरक स्त्रवण्याचे प्रमाण कमी होते.
- शस्त्रक्रिया करुन संपूर्ण थायरॉईड ग्रंथी किंवा तिचा काही भाग काढला जातो.

**रुग्ण समुपदेशन-**

- रुग्णाच्या यकृत हानीची चिन्हे किंवा लक्षणे दिसल्यास तसेच पंडुरोग किंवा संसर्ग ( ताप, डोकेदुखी, आजारी असल्यासारखे वाटणे, त्वचेवर पुरळ येणे, घसा सुजणे) यासारख्या त्रासाचा अनुभव आल्यास त्वरीत डॉक्टरांस कळवावे.
- औषधांमुळे रक्तातील शर्करेचे प्रमाण कमी झाले आहे असे दिसेल त्यामुळे मधुमेही रुग्णांनी रक्तशर्करेच्या पातळीवर लक्ष ठेवावे.
- रेडिओॲक्टीव्ह आयोडिन उपचारास जाण्यापूर्वी महिला रुग्ण गर्भवती नाही याची खातरजमा करावी.

**Reference: Micromedex's Care Notes System Online 2.0**